# शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी मूलनिहाय नियोजन उपयुक्त

सन २०१९पासून ग्यानप्रकाश फाउंडेशन सोलापूर जिल्ह्यामध्ये जिल्हा प्रशासन, आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्याबरोबर काम करत आहे. विद्यार्थ्यांमध्ये विविध क्षमतांचा विकास व्हावा, त्यांची शैक्षणिक प्रगती एका विशिष्ट दिशेने होऊन त्यांचा गुणात्मक विकास व्हावा आणि शिक्षकांची क्षमता बांधणी व्हावी यासाठी केंद्र पातळीवर शिक्षण परिषदा, केंद्र संसाधन सभा होणे आवश्यक असते. त्या नियमितपणे घेतल्या जाव्यात आणि त्यातून शिक्षण प्रक्रियेची गुणवत्ता सुधारावी यासाठी ग्यानप्रकाश फाउंडेशन वर दिलेल्या सर्व यंत्रणांबरोबर समन्वयाने काम करत आहे.

सोलापूरमधल्या कळमन केंद्रातल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत अध्यापनाचे काम करणारे इयत्ता चौथीचे शिक्षक श्री. सूर्यकांत निचळ यांनी लिहिलेला वृत्तांत खाली त्यांच्याच शब्दांत दिला आहे.

मी उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमन केंद्रामध्ये जि.प. केंद्रशाळा कळमन येथे ४थीच्या वर्गात अध्यापनाचे काम करतो. वर्गातल्या एकूण मुलांची संख्या ५३ आहे. मुलांच्या जास्त संख्येमुळे त्यांच्या प्रत्येक क्षमतेवर काम करणे कठीण जात होते. तसेच प्रत्येक मूल क्षमता विकासाच्या बाबतीत कोठे आहे हे समजून घेताना अडचणी येत होत्या. साहजिकच प्रत्येक मुलांच्या क्षमतेनुसार काम करणे शक्य होत नव्हते. तर सर्व मुलांमधल्या सामायिक मूलभूत क्षमतेच्या आधारावर काम करणे भाग पडत होते. मुलांचे गट तयार करून शिकवले तरी हे गट अपेक्षित अध्ययन निष्पत्तीनुसार केले जात होते. परंतु मुळात त्या सर्व विद्यार्थ्यांची त्या विशिष्ट अध्ययन निष्पत्तीला पोचण्याची पूर्वतयारी झाली आहे का नाही हे यात बघितले जात नव्हते. वास्तविक इतरांपेक्षा क्षमता विकासाच्या बाबतीत पुढे असणाऱ्या मुलांसाठी व तुलनेने मागे असणाऱ्या मुलांसाठी वेगवेगळे नियोजन असणे आवश्यक आहे. परंतु हा विचार खूप कमी वेळा केला जात असे. शिवाय प्रत्येक मुलासाठी स्वतंत्र नियोजन करणे अधिक कष्टदायकही होते.

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ मध्ये कळमन केंद्रामध्ये केंद संसाधन गटाची बैठक झाली. ही बैठक ग्यानप्रकाश फाऊंडेशनने आयोजित केली होती. यामध्ये ग्यानप्रकाशच्या सदस्यांनी अध्ययन निष्पत्तीवर आधारित मूलनिहाय नियोजन कसे करावे याचे प्रात्यक्षिक आम्हाला दिले. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती वेगवेगळी असते. म्हणून एका दृष्टीक्षेपात तुम्हाला सबंध वर्ग बघायचा असेल तर मूलनिहाय नियोजन पद्धत वापरणे आवश्यक आहे. एखाद्या अध्ययन निष्पत्तीसाठी शिकवण्याचे नियोजन करताना क्षमतेनुसार मुलांचे गट तयार करणे, त्यांच्यासाठी विविध उपक्रम शोधणे, त्यांचे मूल्यमापन कसे करावे हे ठरवणे या गोष्टी त्यांनी आम्हाला शिकवल्या. त्यानंतर होणाऱ्या शिक्षण परिषदेपर्यंतच्या काळात या बैठकीत शिकवण्यात आलेल्या गोष्टी मी अमलात आणून बघायच्या आणि नंतर शिक्षण परिषदेत त्या इतर शिक्षकांसमोर सादर करायच्या असे ठरले. मग मी इयत्ता चौथीतल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे अध्ययन निष्पत्तीनुसार मूलनिहाय नियोजन तयार करून शिकवायला सुरुवात केली. तसेच त्याला क्षमतेनुसार घेतलेले उपक्रम व मूल्यमापन यांची जोड दिली. त्यामुळे प्रत्येक मुलासाठी अपेक्षित अध्ययन निष्पत्ती गाठता येऊ लागली.



शिक्षण परिषदेमध्ये वर्गात राबवीत असलेले मूलनिहाय नियोजन सादर करताना

मी केंद्रातील केंद्र संसाधन गटाचा सदस्य असल्याने शिक्षण परिषदेमध्ये हा अनुभव मांडण्याची जबाबदारी माझ्याकडे दिली होती. या शिक्षण परिषदेलादेखील ग्यानप्रकाश फाउंडेशनचे सदस्य उपस्थित होते. मात्र यावेळी प्रत्यक्ष सादरीकरण करण्याचे काम मी केले आणि त्यांनी मला आवश्यक तिथे मदत केली. परिषदेमध्ये वर्ग स्तरावर नियोजन करून प्रत्येक मुलासाठी नियोजन करता येते, त्यानुसार मुलांना शिकवण्यासाठी साहित्य किंवा उप्रकम निवडणे सोपे होते आणि उत्तम प्रकारे मूल्यांकन करता येते हे मुद्दे मी मांडले. सुरुवातीला काही शिक्षकांनी यावर शंका उपस्थित केल्या. प्रत्येक मुलाचे वेगळे नियोजन करायचे का? मग त्यांची अध्ययन निष्पत्ती कशी ठरवायची? असे प्रश्न होते. त्यांना हे वाढीव काम वाटत होते. मग शिक्षण परिषदेमध्ये इयत्तेनुसार शिक्षकांचे गट करून प्रत्येक गटाकडून मूलनिहाय नियोजन तयार करून घेतले. त्यामध्ये मुलांची नावे न टाकता फक्त त्यांच्या अध्ययन निष्पत्तीनुसार त्यासाठी आवश्यक क्षमता कशा ठरवाव्या, त्यानुसार कोणते उपक्रम आणि साहित्य वापरावे, त्याचे मूल्यमापन कसे करावे? याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. यामध्ये केंद्रप्रमुखांच्या पुढाकाराने जवळपास ७०% शिक्षकांनी मूलनिहाय नियोजन करून पाहिले.

वर्गस्तरावर मूलनिहाय नियोजनाचा वापर करत असताना सुरुवातीला बऱ्याच अडचणी आल्या. सर्व वर्गाचे नियोजन कसे करावे? क्षमतेनुसार गट करून उपक्रम घेत असताना सर्व विद्यार्थ्यांना त्यात सहभागी करून घेता येईल का? अगोदरच ती क्षमता विकसित झालेल्या विद्यार्थ्यांचे काय करावे? असे अनेक प्रश्न पुढे येत होते. परंतु शिकवणे, विविध उपक्रम घेणे, मूल्यमापन करणे या प्रक्रिया सातत्याने करत गेल्यावर अपेक्षित बदल दिसून येण्यास सुरुवात झाली. शैक्षणिक साहित्याच्या आणि उपक्रमांच्या मदतीने मुले अधिक वेगाने शिकू शकतात. त्यासाठी त्याचा नियोजनात समावेश करणे, त्यांच्यासाठी विविध उपक्रम आखणे आणि शैक्षणिक साहित्य वापरण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यानुसार अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा आणि उपक्रमांचा समावेश केला आहे. वर्गामधील प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने शिकवायचे असले तरी त्याला वेळेचे बंधन होतेच. डिसेंबर व जानेवारी या महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यामुळे या काळात शिकवण्यासाठी वेळ खूपच कमी पडतो. मात्र या काळात मूलनिहाय नियोजन करून शिकवल्याने, क्षमतेनुसार गट केल्याने आणि मुलांना घरी काम दिल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याची नेमकी गरज पूर्ण होऊन गुणवत्ता विकासाची गती थांबली नाही. तसेच प्रत्येक वर्गाचे प्रत्येक महिन्याचे मूलनिहाय नियोजन होणे आवश्यक असल्याचे ठळकपणे लक्षात आले.

एक शिक्षक या नात्याने मुलांच्या गुणवत्ता वाढीसाठी केलेले नियोजन मला क्षमताधिष्ठित शिक्षणाच्या तालुकास्तरीय कार्यशाळेत मांडण्याची संधी मिळाली. शिक्षण परिषदेनंतर सुमारे दोन महिन्यांनी ग्यानप्रकाश फाउंडेशनने ही कार्यशाळा आयोजित केली होती. प्रत्येक अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी कोणत्या क्षमता विकसित कराव्या लागतात आणि त्यासाठी शिक्षण परिषदेमध्ये उपक्रम ठरवून घेतल्याने सर्व शाळांमध्ये त्याविषयी एकवाक्यता तयार होते हा मुद्दा यामध्ये समोर आला. तसेच यामध्ये मूलनिहाय नियोजनाची गरज अधोरेखित झाली. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे जेष्ठ अधिव्याख्याते श्री. नदाफ सर, गटशिक्षणाधिकारी व सर्व केंद्रप्रमुख यांच्यासमोर हे नियोजन सादर केले.



क्षमताधिष्ठित शिक्षणाच्या कार्यशाळेत वर्गात राबवीत असलेले मूलनिहाय नियोजन मांडताना

वर्गस्तरावर मूलनिहाय नियोजन केल्यामुळे प्रत्येक मुलाची गरज पाहून गट पद्धतीने शिकवणे, तसा अभ्यास देणे, मुलांच्या क्षमतेनुसार वेगळे नियोजन आणि ज्या मुलांना अपेक्षित क्षमता प्राप्त झाल्या आहेत त्यांना त्यापुढच्या संधी देणे या पद्धतीने काम होत आहे. मुलांचे मूल्यमापन करताना त्यांच्या गतीनुसार ते केल्याने प्रत्येक मुलाचा त्यात सक्रीय सहभाग दिसून येतो. ज्या मुलांना लेखनात अडचणी येतात त्यांच्यासाठी तोंडी मूल्यमापन घेतल्याने अशा मुलांमधल्या सुप्त गुणांना गती देता आली हेही नक्की जाणवते. तसेच जी मुले तुलनेने पुढे आहेत त्यांचे वेगळे मूल्यमापन घेतल्याने आपण इतरांपेक्षा खूप पुढे आहोत अशी भावना त्यांच्या मनात डोकावत नाही. यापुढे जाऊन प्रत्येक मुलाचे केलेले मूल्यमापन विद्यार्थी संचयिकेमध्ये (पोर्टफोलिओमध्ये) जतन करणे आणि त्यावरून मुलांची प्रगती इतर शिक्षक, पालक यांना कळवणे असे नियोजन आहे.